दै. लोकमत दि. 07-12-23

# ऑटोरिक्षात पाळत ठेवून ज्येष्ठांना लुटणारी टोळी जेरबंद

## वाशिमच्या सुवर्ण कारागिराला होते लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** ऑटोत ज्येष्ठांवर पाळत ठेवून लुटणाऱ्या टोळीला वजिराबाद पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. ४ डिसेंबरच्या रात्री या टोळीने वाशिम येथील सुवर्ण कारागीर दाम्पत्याला बसस्थानक परिसरात लुबाडले होते. चारही आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. शिवकुमार सत्यनारायण वर्मा (रा.काटीवेश, हनुमान मंदिर), वाशिम हे पत्नीसह नांदेड शहरात खासगी कामानिमित्त आले होते.

४ डिसेंबर रोजी १० वाजता सिटी बसस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे ते ऑटोने जात होते. यावेळी ऑटोचालकाने मध्येच या दोघांनाही खाली उतरविले. ऑटोमध्ये अगोदरच दोघेजण समोरच्या सीटवर बसलेले होते, तर वर्मा यांच्याजवळ एकजण बसून होता. त्यानंतर ऑटोचालक आणि इतर तिघांनी वर्मा यांना जीवे मारण्याची धमकी देऊन खिशातील १३ हजार काढून घेतले होते. तसेच एटीएम आणि पॅन कार्डही नेले. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराय धरणे, उपाधीक्षक सुरज गुरव यांनी पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांना आरोपींना अटक करण्याच्या सूचना दिल्या. डीबी पथकाने खबऱ्याकडून माहिती काढून शेख हाजी शेख खालेद (रा.नवी आबादी), मंगेश नारायण सोनकांबळे (रा.आंबडेकरनगर), शेख बाबू शेख फरीद (रा.नवी आबादी) आणि शेख वसीम उर्फ लंगडा (रा.नवी आबादी) या चारजणांना अटक केली. तसेच ऑटो जप्त केला. न्यायालयाने आरोपींना पाच दिवसांची कोठडी सुनावली.



### वयोवृद्ध प्रवाशांना टार्गेट

■ चोरट्यांची ही टोळी बसस्थानक परिसरात सक्रीय होती. रात्रीच्या वेळी वयोवृद्ध प्रवाशांना ते टार्गेट करीत होते. त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या पथकात पो.नि.घोरबांड यांच्यासह पोहेकॉ. दत्तराम जाधव, विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, अरुण साखरे, शेख इमरान, रमेश सूर्यवंशी, भाऊसाहेब राठोड यांचा सहभाग होता.

दै. सकाळ दि. 07-12-23

# ऑटोरिक्षात ज्येष्ठ नागरिकांना लुटणारी टोळी गजाआड

## वजिराबाद पोलिसांची कारवाई; आरोपींना पाच दिवसांची कोठडी

**नांदेड, ता. ६ :** शहरातील ॲटोरिक्षामध्ये ज्येष्ठ नागरिकांवर पाळत ठेवुन त्यांना लुटणाऱ्या टोळीला वजिराबाद पोलीसांनी अटक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी चौघांना अटक केली असून त्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशिम येथील व्यापारी शिवकुमार सत्यनारायण वर्मा (वय ६३) हे पत्नीसह सोमवारी (ता. चार) नांदेडला आले होते. परत रात्री दहा वाजताच्या सुमारास ॲटोरिक्षातून (एमएच-२६ - एन-५६२५) शहर बसस्थानक ते मध्यवर्ती बसस्थानकाकडे जात होते. त्यावेळी ॲटोचालक व त्याच्या सोबतचे इतर तीन जणांनी वर्मा व त्यांच्या पत्नीस ॲटोतुन खाली उतरवले. वर्मा यांना दम देवून त्यांच्या पॅन्टच्या खिशातील रोख १३ हजार रूपये, एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. सोबत झटापट करून पैसे चोरून नेले. या प्रकरणी वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर वजिराबाद पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने उपलब्ध माहितीच्या आधारे शहरामध्ये शोध घेऊन आरोपी शेख हाजी शेख खालेद, मंगेश नारायण सोनकांबळे, शेख बाबु शेख फरीद आणि शेख वसीम ऊर्फ लंगडा शेख सत्तार (रा. सर्व नांदेड) या चौघांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. या प्रकरणी तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रविण आगलावे यांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता चार आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.